# JUNE - Highlights

www.anamprem.org













## रोटरी क्लब कडुन अनामप्रेम संचलित गौरांग अभिनव शाळेला नवीन संगणक संच भेट

अहिल्यानगर मधील रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. कुणाल कोल्हे तसेच रोटरी क्लबचे संचालक श्री नितीन थाडे यांच्या माध्यमातून रोटरी क्लब द्वारे गौरांग अभिनव शाळेसाठी नवीन संगणक सेट भेट स्वरुपात मिळाला. शाळेचे मुख्याध्यापक श्री. विष्णू वारकरी तसेच शिक्षक राजु भगत, रामू बांडेबुचे, सुरेखा कोतकर यांनी ही भेट स्वीकारली.

गौरांग शाळेला संगणक सेट भेट मिळाल्यामुळे या शाळेत शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ मिळणार असून, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला अधिक चालना मिळेल. हा संगणक सेट पाहून सर्व शाळेतील दिव्यांग विद्यार्थी आनंदित झाले.

## हेलन केलर यांची 145 वी जयंती ग्राम प्रकल्पात उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी..!

अनामप्रेम संस्था आणि एक कदम और फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राम प्रकल्पामध्ये हेलन केलर यांची 145 वी जयंती मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.
कार्यक्रमाची सुरुवात हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. त्यानंतर अंध विद्यार्थ्यांनी त्यांच्या संघर्षमय आणि यशस्वी जीवनावर आधारित मनोगते मांडली. विद्यार्थ्यांनी सादर केलेले गीतगायन, कथाकथन आणि संवाद यांमधून हेलन केलर यांच्या जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाचे दर्शन घडले.

नगर जिल्ह्यातील एक कदम और फाउंडेशनशी संलग्न दृष्टिहीन विद्यार्थी आणि त्यांचे पालक या कार्यक्रमासाठी खास उपस्थित होते. अनामप्रेमच्या ग्राम प्रकल्पातील शिक्षक, कार्यकर्ते आणि विद्यार्थी यांनीही कार्यक्रमात सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचा उद्देश होता की दृष्टिहीन विद्यार्थ्यांच्या मनात हेलन केलर यांच्या संघर्षातून प्रेरणा घेऊन स्वतःचं आयुष्य आत्मविश्वासाने घडवण्याचा संदेश रुजवावा.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल अनामप्रेम संस्थेचे अध्यक्ष मा. अजित माने साहेब यांनी एक कदम और फाउंडेशनच्या सौ. सुवर्णा मॅडम व त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष आभार मानले.



Scanned with OKEN Scanner



🌱 "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" पर्यावरणप्रेम आणि समाजसेवेचा अनोखा संगम..!

श्री अशोक साळुंखे सरांनी त्यांचा ६३ वा वाढदिवस अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात ६३ उपयुक्त वृक्षांची लागवड करून आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला.

"झाडे लावा, झाडे जगवा" या संदेशासह पार पडलेल्या या उपक्रमात साळुंखे सरांसोबत त्यांच्या परिवारातील सदस्य, मित्रमंडळी, ग्राम प्रकल्पातील दिव्यांग विद्यार्थी, कार्यकर्ते आणि अनामप्रेमचे पदाधिकारी सहभागी झाले.

या वृक्षारोपणामुळे पर्यावरण संवर्धनाबरोबरच ग्राम प्रकल्पाला हिरवळ, सावली आणि फळांचा अमूल्य ठेवा लाभणार आहे.
साळुंखे सरांनी आपल्या भाषणात प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावण्याचे वचन द्यावे, असे आवाहन करत पर्यावरणाचे मोल अधोरेखित केले.

हा उपक्रम निसर्गाशी नाते जपणारा आणि पुढील पिढीला प्रेरणा देणारा ठरला आहे.!

🌱



हरदिन मॉर्निंग ग्रुपचा २५ वा वर्धापन दिन – समाजसेवेचा मंगल सोहळा.!

भिंगार येथील हरदिन मॉर्निंग ग्रुपचा २५ वा वर्धापन दिन आणि पुस्तक प्रकाशन सोहळा उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. या खास दिवशी फक्त आनंदोत्सव न साजरा करता, त्यांनी विविध सेवाभावी संस्थांना – त्यात अनामप्रेम संस्थेच्या दिव्यांग विद्यार्थ्यांसह – शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली.
दहावी व बारावी परीक्षेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहन देणे, हा उपक्रम अधिक प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमास संस्थापक अध्यक्ष मा. संजयजी सपकाळ सर, तालुका पोलीस अधिकारी मा. प्रल्हाद गीते सर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.
हरदिन ग्रुपने वर्धापन दिनाच्या निमित्ताने समाजसेवेचा अनोखा आदर्श घालून दिला – खऱ्या अर्थाने हा दिवस ठरला समाजभिमुख विचारांचा आणि माणुसकीचा उत्सव.!



अनामप्रेम ची मासिक आढावा बैठक ग्राम प्रकल्पात मोठ्या उत्साहात संपन्न..

आज अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात संस्थेची मासिक आढावा बैठक यशस्वीरित्या पार पडली. या बैठकीस इंजि. अजित माने, मा. श्री. अनिल गावडे व सौ. अनिता माने यांची उपस्थिती होती.
या वेळी संस्थेच्या विविध प्रकल्पांतील विभाग नुसार कामाचा एप्रिल व मे २०२५ या कालावधीतील सविस्तर आढावा संबंधित विभाग प्रमुखांनी प्रभावी प्रेझेंटेशनच्या माध्यमातून सादर केला.
मा. अनिल गावडे सरांनी सामाजिक क्षेत्रातील शिस्तबद्ध नियोजन, कार्याचा प्राधान्यक्रम आणि संस्थेविषयी असलेली तळमळ या विषयांवर मार्गदर्शन करत कार्यपद्धतीत सातत्य आणि परिणामकारकता राखण्याचा महत्त्वपूर्ण संदेश दिला.

इंजि. अजित माने सरांनी संस्थेच्या आगामी योजनांची माहिती देत कार्यकर्त्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. तसेच, सर्व कामे दिलेल्या वेळेत व जबाबदारीने पूर्ण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.



Scanned with OKEN Scanner



## मान्यवरांना संस्था भेटीचे निमंत्रण -

डॉ. आर. एस. लोंढे सरांचा सन्मान..!
36 वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त होत असलेल्या डॉ. आर. एस. लोंढे सर (विभागप्रमुख, अप्लाइड मेकॅनिक्स – GCOE, संभाजीनगर) यांचा अनामप्रेमतर्फे शॉल व नॅपकिन बुके देऊन सत्कार करण्यात आला.



जैस्वाल महिला संघटनेची अनामप्रेमला सदिच्छा भेट.!
अध्यक्षा सौ. कंचनताई महेन्द्रजी जैस्वाल व सहा पदाधिकाऱ्यांनी अनामप्रेमच्या मराठवाडा प्रकल्पाला भेट देऊन किराणा साहित्य आणि आर्थिक सहयोगाची मदत.

.

आशादायक भेट..!
श्री कचरुजी वेळंजकर यांच्या पुढाकाराने अनामप्रेमतर्फे मा. मंत्री श्री अतुलजी सावे (दिव्यांग कल्याण व इतर विभाग) यांची 9 जून रोजी सदिच्छा भेट झाली.




मिलिंद कॉलेज ऑफ आर्ट्स चे उप प्राचार्य डॉ एस. पी. बुरकुल आणि प्राध्यापक वृंद डॉ देसले, डॉ गवळी, डॉ खरात, डॉ लिहिणार यांची भेट.



मान्यवरांच्या भेटी..!
मिलिंद कॉलेज ऑफ सायन्स चे प्राचार्य डॉ एस. पी. राठोड यांच्या समवेत विविध विभाग प्रमुख डॉ कुरमुडे, डॉ येन्नावार, डॉ इंगळे, .

अनामप्रेमचा सिडको परिसरात प्रभावी परिचय!
सौ. उज्वला मोतींगे यांच्या "माहेर" काव्यसंग्रह प्रकाशन सोहळ्यात अनामप्रेमच्या कार्याचा उल्लेख व कौतुक करण्यात आले.






डॉ. लतिका नरवडे यांची अनामप्रेमला सदिच्छा भेट..!



Scanned with OKEN Scanner





## दिव्यांग बांधवांसाठी रोजगार व स्वावलंबनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल.!

मा.नीलेश लंके अपंग बहुउद्देशीय कल्याणकारी प्रतिष्ठान, आधार दिव्यांग बहुउद्देशीय कल्याणकारी ट्रस्ट, अनामप्रेम संस्था व Youth4Jobs यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर येथे दिव्यांग बांधवांसाठी नौकरी व व्यवसाय कर्ज शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.
या उपक्रमात पारनेर तालुका तसेच शिरूर परिसरातील अनेक दिव्यांग बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या शिबिराच्या माध्यमातून दिव्यांग युवक-युवतींना रोजगाराच्या संधी, स्वावलंबनासाठी मार्गदर्शन व आर्थिक मदतीचे पर्याय उपलब्ध करून देण्यात आले.

हा उपक्रम दिव्यांग बांधवांच्या सशक्तीकरणासाठी एक प्रेरणादायी पाऊल ठरला असून, स्वाभिमानाने जगण्याची नवी उमेद देणारा ठरला आहे.

## सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पातील विजेच्या कामाबाबत महावितरणच्या सहकार्याला सलाम.!

सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे इलेक्ट्रिक डीपी बसविणे, डीपी चार्जिंगची परवानगी मिळवणे, वीज मीटर बसविणे यांसारख्या महत्त्वपूर्ण कामांमध्ये महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता श्री. उमाकांत सपकाळे साहेब यांनी अनमोल सहकार्य दिले.

या सहकार्याबद्दल आज डॉ. मेघना मराठे यांच्या हस्ते त्यांच्या कार्यालयात एक छोटेखानी, पण मनःपूर्वक सत्कार करण्यात आला.

श्री. सपकाळे साहेब लवकरच प्रकल्पाला भेट देणार आहे




राष्ट्रीय दृष्टिहीन संघ आयोजित युवा महोत्सव, आळंदी येथे अनामप्रेमची विद्यार्थिनी कु. गौरी इंगळे हिने गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला..!



Scanned with OKEN Scanner




**अनामप्रेम व IMA यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य आणि सेवा यांचा संगम.!**

**29 जून रोजी अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे डॉक्टर्स डे निमित्त अनामप्रेम संस्था आणि इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत रोग निदान शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले.**
**या शिबिरात 17 नामवंत तज्ज्ञ डॉक्टरांनी बालरोग, नेत्र, त्वचा, अस्थिरोग, दंतचिकित्सा, मधुमेह, रक्तदाब अशा विविध आजारांची तपासणी केली व आवश्यकतेनुसार औषधोपचारही दिले.दिव्यांग विद्यार्थी, लाभार्थी व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.**

**या उपक्रमात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचाही संदेश दिला गेला.विशेष म्हणजे, IMAच्या डॉक्टरांनी संस्थेच्या दिव्यांगांनी तयार केलेली सॅनिटरी पॅड्स व सर्जिकल स्लीपर्स आपल्या दवाखान्यांसाठी घेण्याचे आश्वासन दिले, हे संस्थेच्या आत्मनिर्भरतेच्या दिशेने मोठे पाऊल ठरले.**

**हा उपक्रम ठरला आरोग्य, सेवा, पर्यावरण आणि आत्मनिर्भरतेचा प्रेरणादायी संगम.!**







**चैतन्य फाउंडेशनकडून दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा हात..!**

**अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे आयोजित विशेष कार्यक्रमात चैतन्य फाउंडेशनतर्फे संस्थेतील सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप करण्यात आले.**

**पेन, वही, पाटी, दप्तर, स्केचपेन, पेंसिल यांसारख्या उपयुक्त साहित्यांनी भरलेली शैक्षणिक किट विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवत गेली. हा उपक्रम केवळ मदत म्हणून नव्हे तर दिव्यांगांच्या शिक्षणप्रवासाला बळ देणारा आणि आत्मविश्वास वाढवणारा ठरला.**



Scanned with OKEN Scanner





अनामप्रेम - सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास मान्यवरांची भेट.!

अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे आज मा. श्री. अनिल गावडे यांच्या सोबत मा. श्री. झावरे सर व मा. श्री. चुडिवाल सर यांनी सदिच्छा भेट दिली.

या वेळी मान्यवरांना प्रकल्पातील विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण, प्रशिक्षण, आत्मनिर्भरतेसाठी चालणारे कौशल्यविकास प्रकल्प हस्तकला व नॅपकिन उत्पादन प्रकल्पांना भेटी दिल्या.



**सेवेचा आनंद आणि वाढदिवसाची आनंदी भेट..!**

**आज सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे डॉ. किशोर कवडे, डॉ. मुकुंद विधाते, डॉ. नम्रता मराठे, डॉ. पूनम विधाते आणि डॉ. संध्या कवडे यांनी चि. पार्थ, ऋग्वेद, कु. आर्या आणि शौर्या यांच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय बॅग व स्वादिष्ट नाश्ता देत आनंद साजरा केला.**

**यावेळी अनामप्रेम प्रकल्पातील शैक्षणिक, कौशल्यविकास आणि आत्मनिर्भरतेसाठी चालणाऱ्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. संपूर्ण प्रकल्पाच्या भेटीदरम्यान त्यांनी नॅपकिन बुके पाहून विशेष आनंद व्यक्त केला आणि भविष्यात अशा उपक्रमांसाठी ऑर्डर देण्याचे व शैक्षणिक मदत करण्याचे आश्वासन दिले.**

Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM - Visitors


















"सितारे ज़मीन पर" विशेष – दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी क्षण.!

अंकित राका व त्यांच्या मित्र परिवाराच्या सहकार्याने, अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग मुलांना आमिर खान यांचा 'सितारे ज़मीन पर' हा हृदयस्पर्शी चित्रपट दाखवण्यात आला.





गायन व हार्मोनियम परीक्षेत अनामप्रेम विद्यार्थ्यांचे घवघवीत यश..!
अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय आयोजित परीक्षेत अमर सोमवंशी, बलराम यादव, काजल अस्वले व राधा यादव यांनी उज्वल कामगिरी केली.






अनामप्रेम संचलित पुणे वस्तीगृह आता नवीन जागेत – धनकवडी, पुणे येथे स्थलांतरित झाले आहे.
सेवेचा नवा टप्पा, दिव्यांग बांधवांसाठी अधिक सक्षम पाऊल...



Scanned with OKEN Scanner

स्थापना 2005
अनामप्रेम

# ANAMPREM - ADHARGRAM
## Spinal Cord Injury Centre

**JUNE - 2025**







**अनामप्रेम यशवंत प्रकल्प - स्पायनल कॉर्ड इंजुरी पुनर्वसन केंद्रात सध्या 5 पेशंट उपचार घेत आहेत.**

**अनामप्रेम नोकरी प्रशिक्षण केंद्राची यशस्वी कामगिरी..!**
**जून महिन्यात Y4J प्रशिक्षण केंद्रामार्फत एकूण 15 दिव्यांग विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण करून पुणे, बारामती व छत्रपती संभाजीनगर येथे नोकरी मिळून देण्यास अनामप्रेम टीमला यश मिळाले आहे.**









Scanned with OKEN Scanner

# VISHNU WARKARI

## हिम्मतीचा झेंडा फडकवणारा विष्णू..!



"आयुष्यात सगळं हरलं तरी चालेल,
पण हिम्मत कधीच गमावू नका...
कारण हीच हिम्मत शून्यातून विश्व निर्माण करते..!"

ही ओळ जणू काही विष्णू जगन्नाथ वारकरी यांच्या जीवनाचं सार सांगते.

**विष्णुचे बालपण**

बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील नायगाव दत्तापूर या छोट्याशा गावात, 5 फेब्रुवारी 1990 रोजी विष्णूचा जन्म एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. सुरुवातीचे आयुष्य साधे, शांत आणि निरोगी. पण नशिबाच्या वळणावर पाचव्या वर्षी पोलिओने त्यांना गाठले आणि त्यांच्या आयुष्याचा संपूर्ण प्रवासच बदलून गेला.




आनंदाने खेळणारा बागडणारा विष्णू पोलिओमुळे कमरेखालील भाग निकामी झाल्याने हताश झाला. त्याला चालता येईनासे झाले. त्यामुळे आवडीने बालवाडीत जाणारा विष्णू घरीच राहावे लागत असल्याने उदास राहु लागला. आई-वडिलांना विष्णूची ही अवस्था पाहवत नव्हती, त्यांनी अनेक प्रकारचे वैद्यकीय उपचार विष्णूवर केले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. शेवटी विष्णूच्या भविष्याचा विचार करून छातीवर दगड ठेवत छोट्या विष्णूला त्यांनी स्वामी विवेकानंद हिवरा आश्रम, हिवरे बुद्रुक जि. बुलढाणा येथे शिक्षणासाठी पाठवले. अचानक आलेल्या अपंगत्वावर मात करत विष्णुने पहिली ते बारावी पर्यंतचे शिक्षण तिथे पूर्ण केले. बारावी पर्यंत शिक्षण तर पूर्ण झालं पण करिअरचं काय? भविष्य धूसर होतं.

**अनामप्रेमशी धागा जुळला..**

घरची आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्याने विष्णूला आता नोकरी करुन घरासाठी हातभार लावावा असे मनोमनी वाटत होते. त्या दृष्टीने तो प्रयत्न करत असतानाच त्याला अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक, अहिल्यानगर येथे चालु असलेल्या Youth4Jobs ट्रेनिंग कोर्सबाबत माहिती मिळाली. त्यांनी लगेच संस्थेशी संवाद साधून प्रवेश निश्चित केला आणि हा दोन महिन्यांचा कोर्स यशस्वीपणे पूर्ण देखील केला.



Scanned with OKEN Scanner

**कार्यकर्ता म्हणून प्रवास सुरु..**

कोर्स पुर्ण झाल्यावर प्रकल्पातील व्यवस्थापनाने विष्णुतील शांत, समजूतदार, मेहनती स्वभाव आणि उत्तम संवाद कौशल्य पाहून त्यांना प्रकल्पात लहान-मोठी कामे करण्याची संधी दिली.

रांगोळी पॅकिंगपासून रद्दी व्यवस्थापन, शेतीत भाजी तोडणे, कपड्यांना इस्त्री करुन पॅकिंग करणे अशी सर्व कामे कोणतीही लाज न बाळगता विष्णूने मन लावून केली. याच कामगिरीच्या बळावर पुढे PRO विभागात काम करण्याची संधी त्यांना मिळाली. तिथेही त्यांनी जबाबदारीनं आपली कौशल्यं दाखवली.



त्यांचा प्रामाणिकपणा, कामातील सातत्य, सचोटी, संयम आणि चिकाटी पाहून संस्थेने त्यांना "व्यवस्थापक" या जबाबदारीच्या पदावर नेमलं — आणि एक सामान्य युवक प्रकल्पाच्या नेतृत्वात सहभागी झाला.!

**आयुष्यातली नवी दिशा..**

५ ऑगस्ट २०२१ रोजी संस्थेतील अंशतः अंध गटातील कन्या शुभांगी खोसे हिच्याशी विष्णूचा विवाह झाला. आज ते दोन मुलींचे वडिल असून एक जबाबदार पती, पिता आणि प्रकल्पाचे व्यवस्थापक म्हणून जीवन जगत आहेत.



**अनामप्रेम विषयी विष्णूचे मनोगत -**

"अनामप्रेम माझ्यासाठी केवळ संस्था नाही, तर ती माझ्या आयुष्याची दिशा आहे. मला स्वतःला सिद्ध करण्याची संधी इथे मिळाली. परीसाच्या स्पर्शाने जसे लोखंडाचं सोनं होतं, तसंच अनामप्रेमच्या सहवासानं माझं आयुष्य उजळलं, असं विष्णु अभिमानाने सांगतात. अनामप्रेम परिवाराचे कोटी कोटी आभार मानतात..!



विष्णू वारकरी यांची ही कहाणी जिद्दीने जगणाऱ्यांची कहाणी आहे. नियतीने त्यांच्यावर अपंगत्व लादले असले तरी मनाने ते लढवय्ये आहेत. त्यांच्या संघर्षातून हजारो दिव्यांगांना प्रेरणा मिळते आहे.



Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM SKILL DEVELOPMENT CENTRE
# UDYOG BHAVAN

# Anamprem Products




## 1. Napkin bouquet

"दिव्यांग बांधवांनी तयार केलेले नॅपकिन बुके विक्रीसाठी उपलब्ध - त्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन द्या, आणि विशेष उपक्रमात सहभागी व्हा!"

## 2.Sathi chappal udyog

दिव्यांग बांधवांनी आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेलं महत्त्वाचं पाऊल - त्यांनी तयार केलेल्या साथी चप्पल विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
आपल्या खरेदीतून त्यांना प्रेरणा आणि आधार मिळेल.
कृपया पुढे येऊन हे उत्पादने खरेदी करा आणि त्यांच्या मेहनतीस हातभार लावा!









## 3. Gir Cow Lonkadh Ghee

अनामप्रेम संस्थेच्या गोशाळेत पारंपरिक पद्धतीने तयार केलेले शुद्ध तूप आता विक्रीसाठी उपलब्ध आहे.
हे तूप केवळ दर्जेदारच नाही, तर संस्थेच्या सेवाभावी कार्यासही मदतीचे हात देणारे आहे.
कृपया हे तूप खरेदी करून सेवेसोबत स्वादालाही साथ द्या.!



## 4. Bahuguni Anamamrut

अनामप्रेम संस्थेचे "अनामामृत बहुगुणी थेंब" आता विक्रीसाठी उपलब्ध!
दिव्यांग बांधवांनी तयार केलेले... नैसर्गिक, सुरक्षित आणि बहुगुणी!
उपयोग:
सर्दी, खोकला, कफ, अपचन, दाढदुखी यावर गुणकारी
माऊथ फ्रेशनर म्हणूनही उत्तम!
आरोग्यवर्धक थेंब... सेवाभावातून तयार!





## 5. Sanitary Pad

स्वच्छतेची काळजी, सन्मानाची साथ!
अनामप्रेम संस्थेच्या उद्योग भवनात दिव्यांग बांधवांनी तयार केलेले सॅनिटरी पॅड्स आता विक्रीसाठी उपलब्ध आहेत. हे पॅड्स सुरक्षित आणि आरोग्यदायी असुन स्त्रियांसाठी त्यांची खरीखुरी सखीच आहेत. स्वावलंबनाचं प्रतीक!



अनामप्रेम दिव्यांगनिर्मित उत्पादने मिळवण्याकरिता व अधिक माहितीसाठी संपर्क -7350013805

www.anamprem.org

Scanned with OKEN Scanner

## प्रकल्प स्थलांतर संदर्भात सूचना

# अनामप्रेम

अंध-अपंग-मुकबधीर-अस्थिव्यंग बांधवांसाठीचा आशाकिरण...

## स्थलांतर सूचना

आपण जाणताच आहात की, दिव्यांग मुलांच्या शिक्षण, प्रशिक्षण व रोजगारासाठी कार्यरत असलेल्या अनामप्रेम संस्थेचे पुण्यात सुखसागरनगर येथे वसतिगृह (Hostel) होते. संस्थेच्या कार्याचा वाढता विस्तार पाहता आपणा सर्वांना वसतिगृहात येणे सोयीचे व्हावे तसेच विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सोयीसुविधा मिळाव्यात या हेतूने सदरील वसतिगृह पुणे - सातारा मार्गावर स्थलांतरित करण्यात आले आहे.

अनामप्रेम पुणे वसतिगृहाचा **नवा पत्ता** पुढीलप्रमाणे आहे,

अनामप्रेम पुणे होस्टेल,
सायली सोसायटी,
चैतन्यनगर मैदानाजवळ,
धनकवडी, पुणे – ४११०४३.

ANAMPREM PUNE HOSTEL,
SAYLI SOCIETY,
NEAR CHAITANYANAGAR GROUND,
DHANKAWADI, PUNE-411043

कृपया सर्व देणगीदारांनी, हितचिंतकांनी, स्वयंसेवकांनी संस्था भेटीसाठी तसेच पत्रव्यवहारासाठी वरील नवीन पत्त्यावर संपर्क साधावा ही विनंती.
नवीन पत्त्याच्या माहितीसाठी किंवा स्थलांतरासंदर्भात उद्भवणाऱ्या कोणत्याही शंकांसाठी खाली दिलेल्या मोबाईल नंबर वर संपर्क साधावा.

**संपर्क**

**90117 50022**

## जाहीर आवाहन

# जाहीर आवाहन

### दिव्यांग क्षेत्रातील समर्पित नाव... अनामप्रेम

**अनामप्रेम** संस्था गेली २० वर्ष महाराष्ट्रातील दिव्यांग बांधवांच्या शिक्षण, पुनर्वसन, व्यवसाय प्रशिक्षण व रोजगार निर्मिती करिता समर्पित कार्य करत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील अहिल्यानगर शहर (गांधी मैदान), निंबळक व इसळक गाव, धनकवडी-पुणे आणि गारखेडा परिसर-छ. संभाजीनगर येथील संस्थेच्या अधिकृत प्रकल्पांव्यतिरिक्त ईतर कुठेही, कोणत्याही नावाने किंवा स्वरूपात अनामप्रेमचे प्रकल्प चालविले जात नाहीत.

परंतु गेल्या काही दिवसांपासून असे निदर्शनास आले आहे की, **अनामप्रेम** संस्थेच्या नावाचा गैरवापर करत व दात्यांची दिशाभूल करून संभ्रम निर्माण करत काही विघ्नसंतोषी व्यक्ति देणगी संकलन किंवा वस्तुरूप मदत गोळा करत आहेत. यामुळे अनामप्रेमच्या सन्मानानीय देणगीदारांची फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वरील बाबी लक्षात घेता,

**अनामप्रेम संस्थेच्या सर्व हितचिंतक, देणगीदार व स्वयंसेवकांना नम्र आवाहन करण्यात येते की**, कृपया आर्थिक, वस्तुरूप तसेच इतर सर्व प्रकारची मदत देण्यासाठी अनामप्रेम संस्थेच्या अधिकृत कार्यकर्त्यांशीच संपर्क करावा. संस्थेचे अधिकृत संपर्क क्रमांक खालील प्रमाणे आहेत.

आपल्या विश्वासास पात्र राहणं, हेच आमचं खऱ्या अर्थानं यश आहे.
आपली साथ आणि जागरूकता हीच फसवणूक थांबवण्याची खरी शक्ती आहे.

**हिम्मतभवन वसतिगृह (अहिल्यानगर)**
9011004576, 7350013806, 9011004941

**अनामप्रेम वसतिगृह, पुणे**
9011750022

**अनामप्रेम वसतिगृह, छ. संभाजीनगर**
9011750035

**आधारग्राम स्पायनल कॉर्ड इंजुरी, सेंटर, निंबळक**
7350013803

**सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक, (अहिल्यानगर)**
7350013805, 7350517778, 9422054956

इंजि.अजित माने (अध्यक्ष - अनामप्रेम)
श्री.अनिल गावडे (सचिव - अनामप्रेम)

info@anamprem.org
admin@anamprem.org
www.anamprem.org

**अनामप्रेम परिवार**
अनामप्रेम भवन, गांधी मैदान,
अहिल्यानगर - ४१४००१

/ANAMPREM

## ANAMPREM CONTACT & BANK DETAILS

- **Himmat Bhavan Project** - 7350013806 , 9011004576
- **S.J Gram Project** - 7350517778 , 9011670123
- **Marathwada Project.** - 9921509199 , 9011750035
- **Anamprem Pune Hostel.** - 9422307116 , 9011750022

| | |
|---|---|
| बँकेचे नांव Bank Name | सेंट्रल बँक ऑफ इंडिया Central Bank of India |
| शाखा Branch | अहमदनगर (महा) Ahmednagar (MH) |
| खाते क्रमांक/A/c No. : 3486669726 | |
| आय.एफ.एस.सी.कोड/IFSC Code : CBIN0280670 | |

ANAMPREM
10252110@cbin

हे मासिक पत्रक मा.अध्यक्ष अनामप्रेम गांधी मैदान, अहिल्यानगर येथून प्रकाशित केले आहे.

/ANAMPREM

@ANAMPREM_2005

YOU TUBE INSTAGRAM FACEBOOK

Scanned with OKEN Scanner